# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः28.09.2024** **वारःशनिवार**

---

1. भारताचं सकल देशांतर्गत उत्पन्नाचा दर 6 पुर्णांक 5 ते 7 टक्के राहण्याची अपेक्षा
2. भविष्यात त्वरित निर्णय घेणाऱ्या मुत्सद्दी नेत्याची गरज - सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांचं प्रतिपादन
3. अफ्रिकेत मंकीपॉक्स आजाराचे 32 हजार 400 रुग्ण
4. महाराष्ट्रातल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या मुंबईत बैठका
5. भारत-बांगलादेश दरम्यानच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात आज बांगलादेश तीन बाद 107 धावसंख्येवरुन पहिला डाव पुढे खेळणार

**मासिक-आर्थिक**

भारताच्या सकल देशांतर्गत उत्पन्न अर्थात जीडीपीचा दर साडेसहा ते 7 टक्के राहण्याची अपेक्षा अर्थमंत्रालयानं गुरुवारी जारी केलेल्या अहवालात व्यक्त केली आहे. ऑगस्ट महिन्यासाठीचा मासिक आर्थिक आढाव्यातील आकडेवारी मंत्रालयानं सादर केली. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत आर्थिक वाटचाल चढ्या दरानं कायम होती. सर्व प्रमुख बिगर कृषी क्षेत्रांमध्ये पाच टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. किरकोळ महागाईचा दर ऑगस्ट महिन्यात 3 पुर्णांक 7 टक्क्यांवर राहिला. ग्रामीण भागातील उत्पन्नाला गेल्या महिन्यात चालना मिळाल्याचं या अहवालात नमूद करण्यात आलं आहे. दरम्यान जागतिक स्तरावरील बाजारातील होत असलेले बदल आणि अनिश्चिततेबाबत सतर्कता बाळगण्याचा इशारा या अहवालात देण्यात आला आहे. राज्यांद्वारे भांडवली खर्चात घट, प्रवासी वाहनांची विक्रीवरील नियंत्रण, एरवी गती दर्शवणारी शहरी भागातील ग्राहकोपयोगी वस्तूंची मंदावलेली विक्री आणि वाहन उद्योगातील गती या बाबींचा अहवालात आढावा घेण्यात आल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

**जागतिक-नवोन्मेष**

जागतिक नवोन्मेष निर्देशांकातील 133 देशांच्या अर्थव्यवस्थांची क्रमवारी दर्शवणाऱ्या यादीत भारतानं 39 व्या स्थानी झेप घेतली आहे. भारत 2015 मध्ये 81 व्या स्थानी होता. अर्थव्यवस्थातील ही सुधारणा उल्लेखनीय बाब असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या समाज माध्यानवरील संदेशात म्हटलं आहे. केंद्र सरकार युवकांच्या जीवनात बदल घडवून आणणारी नव्या संधी उपलब्ध करुन देणारी नवोन्मेषाला पुरक अशी परिसंस्था उपलब्ध करुन देण्यास वचनबद्ध आहे. असंही त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. जागतिक नवोन्मेषातील आकडेवापीनुसार, मध्य आणि दक्षिण आशियातील दहा अर्थव्यवस्थांमध्ये भारत प्रथम आहे. लघु-मध्यम-उत्पन्न असलेल्या अर्थव्यवस्थांमध्येही भारत अव्वल स्थानी आहे.

**भविष्यातील-युद्ध**

भविष्यात त्वरित निर्णय घेणाऱ्या मुत्सद्दी नेत्याची गरज असल्याचं सरसेनाध्यक्ष जनरल अनिल चौहान यांनी काल नवी दिल्ली इथ सांगितलं. भविष्यातील युध्दनीतीसंदर्भात तीनही सेनादलांच्या तुकडीचा समावेश असलेल्या अभ्यासक्रमाला संबोधित करताना ते बालत होते. कृत्रिम बुध्दीमत्ता, मशीन लर्निंग, चोरीसंदर्भातील बदलेल्या तंत्रावर आधारित स्टेल्थ तंत्रज्ञान, अतिजलद शस्त्रस्त्र आणि रोबोटिक्समधील प्रगती भविष्यातील युद्धांचे वैशिष्ट्य असतील, असंही ते म्हणाले. भविष्यातील युध्दनीती हवाई आणि अंतराळ युद्ध, नॉन-कायनेटिक युद्ध, सागरी मोहिमा आणि एकाच वेळी विविध स्तरावर लढव्या लागणाऱ्या तंत्रावर आधारित

असेल. अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं या अभ्यासक्रमासंदर्भात दिली आहे. तसंच आधुनिक युद्धक्षेत्रातील गुंतागुंत हाताळण्यासाठी तंत्रज्ञान-सक्षम लष्करी कमांडर्सचे कॅडर तयार करणे हे या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**<u>आयुर्वेद-नवोन्मेष</u>**

जागतिक आरोग्यासाठी आयुर्वेदातील नवोन्मेष अशी नवव्या आयुर्वेद दिवसाची मध्यवर्ती संकल्पना आहे. अशी घोषणा आयुष मंत्रालयाचे मंत्री प्रतापराव जाधव यांनी काल नवी दिल्ली इथं केली. 29 ऑक्टोबर रोजी आयुर्वेद दिवस साजरा होणार आहे या पार्श्वभूमीवर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आले आहे त्याती सुरुवात काल जाधव यांच्या हस्ते झाली त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. जागतिक आरोग्य प्रणालीमध्ये आयुर्वेदाच्या योगदानाची क्षमता दर्शवण्यासाठी आयुर्वेदातील नाविन्यपूर्ण उपचार पध्दती कशी उपयोगी आहे याचे महत्व ही संकल्पना अधोरेखित करते. असंही ते म्हणाले. आयुर्वेद दिवस दरवर्षी धन्वंतरी जयंतीच्या मुहूर्तावर साजरा केला जातो. 2016 पासून दरवर्षी आयुर्वेद दिन साजरा केला जातो. हा उत्सव भारतीय पारंपारिक औषध प्रणाली आणि आरोग्यसेवा संस्कृतीच्या प्रणालीचा एक अपरिहार्य भाग म्हणून आयुर्वेदाच्या प्रचारासाठी भारताची वचनबद्धता दर्शवतो.

**<u>मंकीपॉक्स</u>**

अफ्रिकेत यावर्षीच्या सुरुवातीपासून मंकीपॉक्स या आजाराचे 32 हजार 400 रुग्ण आढळून आल्याची माहिती अफ्रिकेतील रोगनियंत्रण आणि प्रतिबंध विभागाच्या अफ्रिका केंद्रानं काल दिली. यामध्ये 6 हजार चारशेपेक्षा अधिक रुग्णांना लागण झाल्याची खात्री झाली असून 840 नागरिकांचा मंकापॉक्सनं मृत्यू झाला आहे अशी माहिती या विभागानं दिली आहे. अनेक देशांमध्ये या आजाराचा फैलाव झाल्याच्या पार्श्वभूमीवरव काल दुरस्थ पध्दतीनं आढावा घेण्यात आला. त्यावेळी अफ्रिकेचे आरोग्य विभागातील डिरेक्टर जनरल जीन कसेया यांनी ही माहिती दिली. गेल्या आठवड्यात 2 हजार 910 नवीन रुग्णांची नोंद झाली असून 436 नागरिक लागण झाल्याची खात्री झाली असून 16 जणांचा मृत्यू झाला आहे. अशी माहितीही त्यांनी दिली. आफ्रिकेतील मंकी पॉक्सची प्रकरणे संपूर्ण अफ्रिकन देशांमध्ये सातत्याने वाढ नोंदवली जाच आहे. या खंडाच्या प्रतिसादाचे प्रयत्न कमी पडत आहे. या भागात रुग्णांचा शोध घेणं, संपर्कात येणाऱ्यांना शोधणं, लागण झालेल्यांवर योग्य उपचार यावर मर्यादा असल्याचं कसेया यांनी यावेळी सांगितलं. आफ्रिका आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, संसर्गानं प्रभावित देशांमध्ये चार टक्क्यांहून कमी रुग्णांवर उपचार आणि इतर सुविधा पोहोचत आहे. अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

**<u>हवामान-आरोग्य-उपाय</u>**

हवामान बदल आणि आरोग्य सुविधा यासंदर्भात कुटुंब आणि आरोग्य कल्याण मंत्रालय आणि आशियाई विकास बँक यांच्यावतीनं संयुक्तपणे आयोजित परिषदेची काल नवी दिल्ली इथं सांगता झाली. हवामान बदल आणि सार्वजनिक आरोग्याच्या समस्यांवर तातडीच्या उपाययोजना कोणत्या असू शकतात याविषयी चर्चा झाली. दोन दिवस झालेल्या या परिषदेत भविष्यातील गंभीर आव्हानांचा सामना करण्यासाठी आरोग्य क्षेत्रासाठी धोरणनिश्चिती करण्याच्या उद्देशाने तज्ञ आणि या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था संघटानांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. आंध्र प्रदेश, आसाम, गुजरात, केरळ आणि तामिळनाडूसह 19 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींच्या अध्यक्षतेखाली हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर प्रतिसादात्मक आरोग्य प्रणाली आणि पायाभूत सुविधांवर चर्चा झाली.

**<u>निवडणूक आयोग</u>**

महाराष्ट्रातल्या आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय निवडणूक आयोगानं काल मुंबईत विविध बैठका घेतल्या. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्यासह ग्यानेश कुमार आणि डॉ. एस. एस. संधू यांनी काल राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरच्या पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. त्यानंतर राज्यातल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी निवडणूक आयोगानं चर्चा केली. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह खात्याचे अतिरीक्त मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल, पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्र आणि इतर राज्यातल्या आगामी विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकाऱ्यांच्या प्रलंबित बदल्या करण्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगानं काल राज्याच्या मुख्य सचिवांना पत्राद्वारे निर्देश दिले.

अधिकाऱ्यांच्या बदलीबाबत अनुपालन अहवाल का सादर केला गेला नाही याचं स्पष्टीकरणही आयोगानं मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालककांकडून मागितलं आहे. एकाच महसूल जिल्ह्यात तीन वर्षांहून अधिक काळ सेवा करत असलेल्या आणि निवडणूक कर्तव्य प्रक्रियेत गुंतलेल्या सर्व अधिकाऱ्यांची बदली करण्याचे आदेश आयोगानं 31 जुलै रोजी दिले होते, त्याबाबत 20 ऑगस्टपर्यंत अनुपालन अहवाल मिळणं अपेक्षित होतं, मात्र वारंवार स्मरणपत्रं देऊनही हा अहवाल सादर करण्यात का आला नाही, याचं स्पष्टीकरण देण्याचा आदेश आयोगानं दिला आहे. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी 25 सप्टेंबर रोजी पोलिस महासंचालकांनी सादर केलेला आंशिक अनुपालन अहवाल पाठविला, परंतु मुख्य सचिवांकडून अद्याप कोणताही अहवाल प्राप्त झालेला नाही. सूचनांचे तात्काळ पालन करून त्याचा अहवाल सादर करण्याचा आदेशही आयोगानं दिला आहे.

**भारत-बांगलादेश-क्रिकेट**

भारत-बांगलादेश यांच्यात कानपूर इथं सुरू असलेल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या आज दुसऱ्या दिवशी बांगलादेश कालच्या तीन बाद 107 धावसंख्येवरुन पहिला डाव पुढं सुरू करेल. मुसळधार पावसामुळं काल पहिल्या दिवसाचा खेळ थांबला, तेव्हा मोमिनुल हक 40 धावांवर आणि मुशफिकर रहीम सहा धावांवर खेळत होता. या सामन्यात भारताच्या आकाशदीपनं दोन, तर रविचंद्रन अश्विननं एक बळी घेतला. तत्पूर्वी, पावसामुळं खेळ सुरू होण्यास उशीर झाल्यानंतर भारतानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. चेन्नईतील पहिल्या कसोटीत बांगलादेशचा 280 धावांनी पराभव करून भारतानं या मालिकेत एक-शून्य अशी आघाडी घेतली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार